




माणदेशाच्या विकासावर दृष्टिक्षेप टाकणारे पुरोगामी विचारसरणीचे एकमेव दैनिक

# माणदूत एक्सप्रेस

स्थापना २००२

www.mandootexpress.com

email- mandootexpress5@gmail.com

संपादक–मोहन मस्के मो.९८५०४०३७७३

■ सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, आटपाडी, जत, सोलापूर, सांगली ■






वर्ष–२४ वे | अंक –१४३ | पृष्ठे–४ | मूल्य – १ रुपये | शुक्रवार दि.१३ मार्च २०२६ | R.N.I. NO. MAHMAR/2002/10619




# सामाजिक समतेशी खेळ...

राजकीय टीका करणे, विरोधकांवर कठोर शब्दांत प्रहार करणे, हे लोकशाहीचे अंग आहे. परंतु एखाद्या समुदायाविषयी संशय निर्माण करणारी, ध्रुवीकरणाला खतपाणी घालणारी भाषा दीर्घकालीन दृष्टीने समाजासाठी घातक ठरते.लोकशाहीत भाषणस्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार असला,तरी तो अमर्याद नाही.सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या व्यक्तींना विशेषतः राजकीय नेत्यांना, लोकप्रतिनिधींना आपल्या शब्दांची सामाजिक,कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी पेलावी लागते. अलीकडील काळात महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाच्या काही नेत्यांच्या वक्तव्यांमुळे राजकीय टीकेची मर्यादा नेमकी कुठे संपते आणि सामाजिक सलोख्याची जबाबदारी कुठे सुरू होते? हा प्रश्न अधिक तीव्रतेने पुढे आला आहे. सत्ताधारी पक्षाने वादग्रस्त वक्तव्ये करून समाजात तेढ निर्माण करणारी, विरोधकांवर अत्यंत टोकाची व खालच्या पातळीवर जाऊन टीका करणाऱ्या उथळ नेत्यांची अख्खी फौज तयार केली आहे. राज्याच्या मंत्रिमंडळातील कॅबिनेट मंत्री नितेश राणे, माजी खासदार व भाजप नेत्या नवनीत राणा, खासदार अनिल बोंडे, यांच्या सोबतच राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांनी गेल्या काही दिवसांत धार्मिक आणि ओळखाधिष्ठित मुद्यांवर घेतलेली तीव्र भूमिका आणि केलेली वादग्रस्त वक्तव्ये समाजात तेढ निर्माण करणारी आहेत, असे राजकीय विश्लेषक म्हणतायेत. ही सर्व उदाहरणे एकत्ररिता मर्यादित राहत नाही; तो राजकीय संवादाच्या दर्जाशी संबंधित ठरतो. भारतीय राज्यघटनेतील कलम १९(१) (अ) नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार देते. परंतु कलम १९(२) नुसार सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता, राष्ट्राची अखंडता आणि इतरांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यासाठी वाजवी बंधनेही आहेत. राजकीय नेते, लोकप्रतिनिधींच्या वक्तव्यांना सामान्य नागरिकांच्या मतांपेक्षा अधिक वजन असते. कारण त्यांची वाणी ही केवळ वैयक्तिक मत नसते; ती त्यांच्या पक्षाची, त्यांच्या विचारसरणीची आणि अनेकदा सरकारची प्रतिमा तयार करते. त्यामुळे सार्वजनिक वक्तव्य करताना संवैधानिक जबाबदारीचे भान आवश्यक आहे. पण दुर्दैवाने गेल्या काही दिवसांत ते पाळले जात नाही. भाजपचे खासदार रमेश बिधुडी यांनी तर लोकशाहीचे पवित्र मंदिर असणाऱ्या लोकसभेत एका अल्पसंख्याक समाजातून आलेल्या खासदाराबाबत अत्यंत हीन पातळीवर जाऊन वक्तव्य केले. पण लोकसभा अध्यक्ष, पंतप्रधान, भाजप अध्यक्षांनी त्यांच्यावर काहीच कारवाई केली नाही. उलट बिधुडी यांच्याप्रमाणे वादग्रस्त वक्तव्ये करणाऱ्या अनेक नेत्यांना राज्यसभा, विधान परिषदेत पाठवून, मंत्रिपदे देऊन बक्षिसी दिल्याची अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. एखाद्या व्यक्तीने कायदा मोडला, तर त्यावर कारवाई व्हावी, ही कायदेशीर बाब आहे. परंतु संपूर्ण धर्म, जात किंवा सामाजिक घटकावर संशयाची सावली टाकणारे सर्वसाधारण आरोप सामाजिकदृष्ट्या अत्यंत धोकादायक असतात. जेव्हा राजकीय भाषणात 'समूह' हा संशयाचा केंद्रबिंदू बनतो, तेव्हा संबंधित समुदायात असुरक्षिततेची भावना निर्माण होते आणि बहुसंख्य समाजात त्यांच्याविषयी अविश्वासाची मानसिकता वाढते. महाराष्ट्रासारख्या राज्यात ही प्रक्रिया अधिक संवेदनशील ठरते. येथे विविध धर्म, भाषा आणि सामाजिक गट शतकानुशतके एकत्र नांदत आले आहेत. अशा पार्श्वभूमीवर उत्तेजक, विभाजन करणारी भाषा वापरणे म्हणजे सामाजिक समतोलाशी खेळ करण्यासारखे आहे. महाराष्ट्राची सामाजिक परंपरा समतेच्या विचारांवर उभी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जाती-धर्माच्या मावळ्यांना सोबत घेऊन रयतेचे राज्य निर्माण केले. त्या स्वराज्यात जात-धर्म-भाषा यावरून भेद केला जात नव्हता. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण आणि सामाजिक न्यायाचा संदेश दिला; राजर्षी शाहू महाराजांनी आरक्षणासारख्या प्रगत धोरणांद्वारे वंचित घटकांना संधी दिली; डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बंधुतेचा सिद्धांत राज्यघटनेत अधोरेखित केला. बंधुता हा शब्द केवळ तात्विक संकल्पना नाही; तो सामाजिक सहअस्तित्वाचा पाया आहे. जर राजकीय संवादातूनच बंधुतेचा धागा कमकुवत झाला, तर समाजात तणाव वाढण्याची शक्यता असते. राजकीयदृष्ट्या उत्तेजक विधानांचा तात्पुरता फायदा होऊ शकतो. ध्रुवीकरणामुळे विशिष्ट मतदारसंघात भावनिक एकजूट निर्माण होते. परंतु याचे दीर्घकालीन दुष्परिणाम समाजावर होतात. ध्रुवीकरणामुळे सामाजिक अविश्वास वाढतो. सार्वजनिक चर्चेची पातळी घसरते. विकास, शिक्षण, आरोग्य यांसारखे मूलभूत प्रश्न बाजूला पडतात. जेव्हा राजकीय अजेंडा ओळखाधिष्ठित संघर्षांवर केंद्रित होतो, तेव्हा लोकशाहीतील धोरणात्मक चर्चेला दुय्यम स्थान मिळते. एखाद्या नेत्याने वादग्रस्त विधान केले, तर त्याबाबत संबंधित पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट असणे आवश्यक असते. सार्वजनिक निषेध, स्पष्टीकरण किंवा शिस्तभंगाची कारवाई यासारखी कोणतीही पावले उचलली नाहीत, तर पक्षाला ही वादग्रस्त विधाने मान्य आहेत, असा संदेश समाजात जातो. मौन हेही एक राजकीय विधान असते. त्यामुळे राजकीय पक्षांनी संवादासाठी अंतर्गत आचारसंहिता विकसित करणे आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात प्रत्येक विधान काही सेकंदांत व्हायरल होते. टीआरपी आणि क्लिकबेटच्या स्पर्धेत वादग्रस्त विधानांचा प्रसार प्रचंड वेगाने होतो. परिणामी, त्याबाबत समतोल विश्लेषणाऐवजी उत्तेजक चर्चा होताना पदोपदी दिसते. माध्यमांनीही वादग्रस्त विधान, जीभ घसरली एवढे म्हणून अशा विधानांना प्रसिद्धी देऊन त्यावरील प्रतिक्रिया दाखवण्यासोबतच, त्या विधानांचे सामाजिक दुष्परिणाम काय होऊ शकतात हे जनतेला समजावून सांगण्याची आवश्यकता आहे. लोकशाहीत संतुलन राखणे ही निवडणूक आयोग, न्यायालये आणि कायदा अंमलबजावणी यंत्रणांची मूलभूत जबाबदारी आहे. आचारसंहितेची अंमलबजावणी, द्वेषपूर्ण प्रचारावर नियंत्रण आणि मूलभूत अधिकारांचे संरक्षण ही भारतीय निवडणूक आयोग व न्यायसंस्थेची घटनात्मक कर्तव्ये आहेत. या संस्था निष्पक्ष आणि पारदर्शक राहिल्या तरच लोकांचा विश्वास टिकतो. मात्र प्रत्येक वादग्रस्त वक्तव्य न्यायालयात नेणे हा कायमस्वरूपी उपाय ठरत नाही. न्यायालयीन प्रक्रिया ही घटना घडल्यानंतरची कारवाई असते; परंतु सामाजिक तणाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक भूमिका अधिक महत्वाची असते. पक्षांतर्गत शिस्त, नेतृत्वाकडून स्पष्ट संदेश आणि सार्वजनिक जबाबदारीची जाणीव ही अधिक प्रभावी साधने ठरतात. कायद्याचा उपयोग दडपशाहीसाठी नव्हे, तर सामाजिक सलोखा आणि सार्वजनिक विश्वास टिकवण्यासाठी व्हायला हवा. लोकशाहीची ताकद केवळ न्यायालयीन आदेशात नसून राजकीय संयम, संस्थांची निष्पक्षता आणि समाजाच्या परिपक्वतेत असते.

माणदूत एक्सप्रेस हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक मोहन शंकर मस्के यांनी भास्कर प्रिटींग प्रेस प्रा.लि. रामदेव वेअर हाऊस, हैद्राबाद रोड, सोलापूर (महाराष्ट्र) येथे छापून १०३२/२ ब लोहार गल्ली, सांगोला ता.सांगोला जि.सोलापूर पि.नं.४१३३०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशीत केले.

माणदूत एक्सप्रेस

EMail: mandootexpress5@gmail.com

दै.माणदूत एक्सप्रेसमधील प्रसिध्द होणाऱ्या बातम्या, जाहीराती व लेखातील मजकूरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# इथून पुढे शेकाप कोणाशीही युती,आघाडी करणार नाही- आ.डॉ.बाबासाहेब देशमुख

सांगोला (प्रतिनिधी):- शेकाप व माजी आमदारांच्या सांगोला तालुका विकास आघाडीकडून निवडून आलेल्या तीन सदस्यांनी ऐनवेळी शेकापला दगा दिल्याने शेकापला पंचायत समितीत सत्तेपासून दूर रहावे लागले याबाबत आ. बाबासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कार्यकर्त्या मधून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली तर आ. बाबासाहेब देशमुख यांनी आता इथून पुढे शेकाप कोणाशीही युती,आघाडी करणार नाही आपण सर्व निवडणुका स्वबळावर लढूया असे स्पष्ट सांगितल्याने या निर्णयाचे सर्व कार्यकर्त्यांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले,यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी भावना व्यक्त केल्या.

शेतकरी सह.सूत गिरणी कार्यस्थळावर झालेल्या बैठकीत संतोष देवकते,शिवाजी व्हनमाने यांनी निवडणुकी पूर्वीच्या नाट्यपूर्ण घडामोडी सांगितल्या.

नगरपरिषदेत पराभव झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी आ.बाबासाहेब देशमुख यांना शेकापने कोणाशीही आघाडी करू नये, आता स्वबळावर निवडणूक लढवूया असे सांगीतले होते व तसा पक्षांर्गत ठरावही पास झाला होता असे असताना आघाडीतील मित्र पक्षांने स्वतः आ. बाबासाहेब देशमुख यांचेकडे येऊन आम्हाला आघाडीत सामावून घ्या, स्व. आबासाहेब यांच्यापासूनची आपली पारंपरिक आघाडी आहे,आपण आघाडी करूया असे म्हणून तसा प्रस्ताव दिला होता, आपण आघाडीसाठी त्यांच्या मागे लागलो नव्हतो त्यानंतर सांगोला तालुका विकास आघाडी स्थापन करून आपण त्यांच्यासोबत



आघाडी केली असे सांगून स्व.गणपतराव देशमुख यांनी सत्तेपेक्षा सर्वसामान्य, शेतकरी, दिनदलीत यांच्यासाठी जो आक्रमक बाणा स्वीकारला त्याप्रमाणे आता जनतेसाठी आक्रमक भूमिका घ्यावी, आपल्या पक्षाचा मूळ ढाचा लढाऊ वृत्ती असाच आहे त्यामुळे आपण राजकारणात नवखे आहात,आपण फसवले गेलो आहोत आता आक्रमक भूमिका घेऊया असे सांगून इथून पुढे एकला चलो रे अशीच भूमिका घ्यावी ,शेकाप विरुद्ध सगळे एकत्र येतात म्हणजे आपली ताकद आहे हेच सिद्ध होते, यावेळी आ. देशमुख यांना तुम्ही जो निर्णय घ्याल तो मान्य आहे अशी आग्रही भूमिका मांडली,यावेळी आ. देशमुख यांनी आलेल्या संकटाला आपण ऐकसंघ पणे सामोरे जाऊया इथून पुढे तुम्ही सांगाल तेच करू असे सांगून स्व.गणपतराव देशमुख हे आमदार,मंत्री होते पण त्यांनी सत्तेसाठी कधीही तडजोड, हव्यास केला नाही हीच आपली भूमिका असल्याचे सांगुन नवीन अनुभव आल्याने पुढील काळात सावध राहू असे सांगितले.

यावेळी चिटणीस दादा बाबर, खंडू सातपुते,नंदकुमार शिंदे, शिवाजी व्हनमाने, गजेंद्र कोळेकर यांनी भूमिका मांडली.

|| खुष खबर || || खुष खबर || || खुष खबर ||

आता सांगोल्यामध्ये जुने कपाट नविन करुन मिळणार तेही घरी येऊन

अरमान अली स्टिल फर्निचर

प्रोप्रा. मुन्ना मिस्त्री (बार्शीकर)

आमचे येथे सर्व नामवंत कंपनीचे कपाट दुरुस्त करुन, तसेच लॉक व काच बदलून मिळेल. तसेच सदरील कामे घरी येवून हि केली जातील...

(टिप आंतर मर्यादा ३० कि. मी. पर्यंत)



आमचा पत्ता

चिंचोली रोड, मोहिते डॉक्टर समोर, आनंदनगर, सांगोला

संपर्क: 7066289266

# महात्मा फुले कॉलेज ऑफ एज्युकेशन सांगोला येथे जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न

सांगोला(प्रतिनिधी):-महात्मा फुले कॉलेज ऑफ एज्युकेशन सांगोला आयक्यूएसी विभाग आणि महिला सक्षमीकरण विभागाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सप्ताह निमित्त महात्मा फुले कॉलेज ऑफ एज्युकेशन सांगोला येथे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये मेहंदी स्पर्धा, पाककला स्पर्धा, आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक स्वाती रावसाहेब पवार, द्वितीय क्रमांक स्वप्निल भारत सावंत, तृतीय क्रमांक श्वेता नागनाथ रासकर आणि रेणुका जालिंदर कासार या दोघींना विभागून देण्यात आला असून उत्तेजनार्थ नंबर सविता शंकर गव्हाणे यांना देण्यात आला.

महिला सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी महिला दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापिका व सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त प्रतिभा शिंदे मॅडम लाभल्या होत्या. तर प्रमुख उपस्थितीमध्ये संस्था उपाध्यक्ष सुमनताई बोराडे लाभल्या होत्या. प्रास्ताविक प्रा. डॉक्टर नाथाजी कांबळे यांनी केले.यावेळी व्यासपीठावर प्राध्यापक दत्तात्रय वाघमारे, ग्रंथपाल दीपक डिकोळे, कांबळे मावशी आदी उपस्थित होते. सुरुवातीला विद्यार्थी स्वाती पवार, स्वप्निल सावंत, सविता गव्हाणे या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केले. यावेळी प्राध्यापक दत्तात्रय वाघमारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रतिभा शिंदे मॅडम यांनी स्त्री शक्ती कशी श्रेष्ठ आहे ते सांगितले.स्त्रियांना जीवनात प्रत्येक भूमिका निभवाव्या लागतात. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे थोड्याफार प्रमाणात बदल झाला असला तरी मुलापेक्षा मुली शिक्षणात आणि इतर क्षेत्रांमध्ये बाजी मारताना दिसतात असे सांगितले. यावेळी सुमनताई बोराडे यांनी जागतिक दिनानिमित्त शुभेच्छा देताना मुलींना शिक्षणाबरोबर इतर गोष्टींची माहिती दिली.

शेवटी प्राचार्य प्रा. डॉक्टर विद्युलता पांढरे मॅडम यांनी सांगितले की सध्या जगात स्त्रिया अनेक क्षेत्रांमध्ये उंच भरारी घेताना दिसतात संपूर्ण नातेसंबंध जपत स्त्री-पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात काम करताना दिसत आहे. त्यांचा आज या महिला दिनी आपण मान सन्मान केला पाहिजे असे सांगितले. शेवटी ग्रंथपाल दीपक डिकोळे यांनी आभार मानले.

सूत्रसंचालन रेणुका कासार हिने केले. शेवटी कार्यक्रम संपल्यानंतर सांगोला शहरातील भाजी विक्रेत्या, बांगड्या विक्रेत्या महिलांचा तिथे जाऊन त्यांना शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.




## भविष्याचे रागरंग

**मेष-** आजचा दिवस फारच आनंदी असेल. कुटुंबासोबत मधुर संबंध राहतील. तुमच्या पत्नीचा किंवा पतीचा पूर्ण पाठिंबा मिळेल. सामाजिक कार्यात रुची वाढेल.

**वृषभ :** आत्मविश्वास प्रचंड वाढलेला असेल. आर्थिकदृष्ट्या फायदा होईल. पर्यटनाशी संबंधित लोकांना लाभ होईल. कुटुंबात सुख-शांती नांदेल.व्यवसायात भागीदारी फायदेशीर ठरू शकते.

**मिथुन:** व्यक्तींनी आजचा दिवस संमिश्र जाईल. मित्रांच्या मदतीने कामात यश मिळेल. आरोग्याची काळजी घ्या. धैर्याने निर्णय घेतल्यास नवीन संधी मिळतील.

**कर्क -** आजचा दिवस फारच व्यस्त असणार असेल. आज आवश्यक कामे पूर्ण होतील, खर्चावर नियंत्रण ठेवा. कोणावरही जास्त विश्वास ठेवू नका. एखाद्या धार्मिक स्थळाला भेट द्याल.

**सिंह :-** आजचा दिवस चांगला जाईल. समस्यांचे समाधान होईल. उसने दिलेले पैसे परत मिळतील. कुटुंबात धार्मिक कार्यात सहभागी व्हायल. इतरांना मदत करण्याची संधी मिळेल.

**कन्या-** आजचा दिवस अनुकूल राहील. जीवनसाथीसोबत चांगला वेळ जाईल. नात्यात सकारात्मकता येईल. कामात यश मिळेल. मित्रांकडून लाभ होण्याची शक्यता आहे.

**तुळ :** आजचा दिवस संमिश्र राहील. कामावर लक्ष केंद्रित करा. विद्यार्थ्यांचे मित्रांसोबत संबंध वाढू शकतात. नवीन जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडाल. तुमच्याबद्दल लोक मत्सर करू शकतात.

**वृश्चिक** काम वेळेत पूर्ण होईल. वैवाहिक जीवनात गोडवा राहील. विद्यार्थ्यांना यश मिळेल. आरोग्य चांगले राहील.

**धनू -** पैशांसंबंधी चांगली बातमी मिळेल. सर्व कामे पूर्ण होतील. एखाद्या खास व्यक्तीची भेट होऊ शकते. सहकाऱ्यांची मदत मिळेल.नवीन लोकांसोबत भेटीगाठी होतील.

**मकर:-** शांत व संयमी विचारांची आवश्यकता. व्यवहारी भूमिका ठेवून वागाल. सर्वांशी सर्जनशीलतेने वागण्याचा प्रयत्न कराल. छंद जोपासण्यात वेळ घालवाल. मित्र परिवारात लाडके व्हाल.

**कुंभ :** कुटुंबासोबत फिरायला जाऊ शकता. जीवनसाथीसोबत चांगला वेळ घालवाल.नशिबाची साथ मिळेल. व्यावसायिकांना लाभ होईल. विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस आहे.

**मीन :-** वैवाहिक जीवन सुखमय राहील. मनात उत्साह राहील. कामाच्या ठिकाणी दबाव वाढू शकतो. त्यामुळे संयम ठेवा. सहकाऱ्यांची मदत मिळेल. विद्यार्थ्यांसाठी चांगला दिवस आहे.

# नाझरा विद्यामंदिर प्रशालेचे ५५ विद्यार्थी एन. एम. एम. एस.परीक्षेत पात्र

नाझरा( वार्ताहर):- शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी अर्थात एन एम एम एस च्या शिष्यवृत्ती परीक्षेत नाझरा विद्यामंदिर प्रशालेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त करत यशाची परंपरा कायम राखली आहे. ग्रामीण भागात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ही परीक्षा अत्यंत महत्त्वाची समजली जाते. या परीक्षेतून अंतिम गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास चार वर्ष शासनाच्या वतीने १२००० रुपयाची शिष्यवृत्ती दरवर्षी दिली जाते. त्यामुळे या परीक्षेत प्राविण्य मिळवण्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थी प्रयत्नशील राहतात.

नाझरा विद्यामंदिर मध्ये या परीक्षेत ५९ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते त्यापैकी ५५ विद्यार्थी पात्र झाले आहेत. सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागात पात्र विद्यार्थ्यांच्या संख्येत नाझरा विद्यामंदिर अव्वल स्थानावर आहे.१४० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ०३ विद्यार्थी, १२० पेक्षा अधिक गुण मिळवणारे १२ विद्यार्थी, तर १०० पेक्षा अधिक गुण मिळवणारे १७ विद्यार्थी आहेत.कार्तिक संभाजी शितोळे व ओम गोपाळ कृष्ण दीक्षित या दोघांनी १४३ गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक येण्याचा मान मिळवला. सुजाता समाधान बाबर हिने १४२ गुण मिळवून दुसरा क्रमांक पटकावला. तसेच प्रथमेश संतोष बाबर या विद्यार्थ्याने १३७ गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला.

सदर विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख गुरुदेव उजनीकर, सोमनाथ सपाटे, शुभांगी नागरसे,मंजुश्री ओतारी यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष प्रबुद्धचंद्र झपके, संस्था उपाध्यक्ष विजयसिंह चव्हाण, संस्था सचिव म. शं. घोंगडे, संस्था सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, मुख्याध्यापक माने बी .एस ,पर्यवेक्षक विनायक पाटील,संस्था बाह्यपरीक्षा विभागप्रमुख नामदेव खंडागळे सर, प्रशाला बाह्यपरीक्षा विभागप्रमुख महालिंग पाटील व प्रशालेचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# फॅबटेक मध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप




सांगोला(प्रतिनिधी):-शैक्षणिक जीवनात परीश्रम, सातत्य आणि आत्मविश्वास यांच्या बळावर जीवनात यश संपादन करा. विद्यार्थ्यांनी खचून न जाता कसून अभ्यास करून जीवनात यशस्वी व्हावे. आयुष्यात स्वतःच्या ज्ञानाच्या जोरावर सुंदर जीवन जगा. आयुष्यातील निर्णय जाणीवपूर्वक घ्या. उत्तम आयुष्य घडविण्यासाठी कणखर, मेहनत आणि योग्य मार्गावर राहणे आवश्यक असते. प्रामाणिक परिश्रम करून आत्मविश्वासाच्या जोरावर भविष्यात नावलौकिक प्राप्त करा, असे प्रतिपादन डॉ. विद्याराणी क्षीरसागर यांनी केले.

फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये बुधवार दिनांक ११ मार्च २०२६ रोजी इयता बारावीच्या विद्यार्थ्यांना संस्थेकडून निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, प्राचार्य सिकंदर पाटील, प्रा. शरद आदलिंगे, प्रा. प्रियांका पावसकर, आदीच्या हस्ते सरस्वती पूजन करून दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विद्याराणी क्षीरसागर होत्या. उपस्थित मान्यवरांचा कॉलेजच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. बारावीच्या विद्यार्थ्यांचे कॉलेजच्या वतीने गुलाब देऊन स्वागत करण्यात आले.

आपल्या शैक्षणिक जीवनातील प्रवासाबद्दल सलोनी गुंगे, सलमा अन्सारी, रोशनी मदने आदींसह अनेकांनी मनोगत व्यक्त करून शिक्षकांप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त केली.

यादरम्यान प्राचार्य सिकंदर पाटील, प्रा. शरद आदलिंगे व प्रा. प्रियांका पावसकर, रेश्मा तोडकर, संजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना व्यावसायिक शिक्षण, नोकरी शिक्षण व व्यवसायाबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पुर्वी सहानी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यसाठी कॉलेज मधील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पंढरपूरात १४ मार्चला राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

पंढरपूर - महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून पंढपूरात दि.१४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असून या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त पक्षकारांनी प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी या लोक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश ओं. रा. देशमुख यांनी केले आहे.

या लोकअदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बँक वसुली, कलम १३८ एनआय ॲक्टची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहीक वादाबाबतची प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

तसेच भूसंपान बाबतची प्रकरणे, बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त, बँक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

या लोकअदालतीमध्ये नगरपालिका यांच्या कर आकारणी व गाळेधारक यांची प्रकरणे तसेच ग्रामपंचायतीमधील घरपट्टी व पाणीपट्टी यांच्या थकीत बिलाची दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात येणार आहे.

ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरीत्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पध्दतीने उपस्थिती राहण्याकरीता ऑनलाईन माध्यमाचा वापर केला जाणार आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये पंढरपूर तालुक्यातील जास्तीत जास्त पक्षकारांनी आपापली प्रकरणे तडजोडीने मिटवून घ्यावेत, असे आवाहनही तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश ओं. रा. देशमुख यांनी केले आहे.




# स्वेरीच्या तीन विद्यार्थ्यांची इंडियन स्पेस लॅब विंटर इंटर्नशिपसाठी निवड

पंढरपूर: गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागातील तीन विद्यार्थ्यांची प्रतिष्ठित इंडियन स्पेस लॅब विंटर इंटर्नशिप व टेक्निकल ट्रेनिंग प्रोग्रामसाठी निवड झाली असून त्यामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.या इंटर्नशिपसाठी दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या कृष्णा राजेंद्र पाटील, शिवराज संदीप ढोणे आणि प्रशांत नागनाथ जाधव या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. हा ४५ दिवसांचा इंटर्नशिप कार्यक्रम दि. ०२ फेब्रुवारी २०२६ ते दि. १७ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांची निवड तांत्रिक परीक्षा, मुलाखत आणि अंतिम निवड अशा स्पर्धात्मक प्रक्रियेद्वारे करण्यात आली आहे.

या इंटर्नशिप अंतर्गत विद्यार्थी विविध प्रगत तांत्रिक प्रकल्पांवर प्रत्यक्ष काम करत आहेत. यामध्ये ओपन व्हीएसपी चा वापर करून सेसना -२१० विमानाचे मॉडेलिंग, फ्यूजन ३६० आणि ईझी ईडीए चा वापर करून ड्युअल रेडंडंट कॅनसॅट / क्यूबसॅट सॅटेलाइट स्ट्रक्चर डिझाईन व पीसीबी लेआउट, तसेच ओपन रॉकेटच्या सहाय्याने सिंगल-स्टेज मॉडेल रॉकेटचे डिझाईन व सिम्युलेशन यांचा समावेश आहे.

# शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्यामध्ये सामंजस्य करार



सांगोला:- विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष यंत्रसामुग्रीचा अनुभव मिळावा आणि त्यांच्यातील कौशल्य विकास वाढीस लागावा, या उद्देशाने शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज, सांगोला आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सांगोला यांच्यात नुकताच एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.

या कराराअंतर्गत सांगोला आयटीआय कॉलेजमधील विद्यार्थ्यांना शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमधील मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागातील आधुनिक यंत्रसामुग्री, सुसज्ज प्रयोगशाळा आणि तांत्रिक उपकरणांची माहिती करून देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे तांत्रिक ज्ञान व कौशल्य विकसित करण्याची संधी मिळाली.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना दि.९ ते ११ मार्च असे तीन दिवस प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना विविध यंत्रसामुग्रीचे कार्य, त्यांचा वापर आणि तांत्रिक प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमासाठी शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज मधील मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख प्रा.संदीप बावचे, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा.अभिषेक शिवशरण तसेच प्रा.विद्याधर पैलवान आणि प्रा.सिमरन इनामदार मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ.रणजीत देशमुख यांनी आपल्या मनोगतात अशा प्रकारच्या शैक्षणिक सहकार्यामुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यात वाढ होऊन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोठी मदत होईल,असे सांगितले. यावेळी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथील प्रा.शिकलगार व प्रा.घाडगे उपस्थित होते.

या उपक्रमामुळे आयटीआय विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख तांत्रिक शिक्षणाचा अनुभव मिळणार असून त्यांच्या कौशल्य विकासाला चालना मिळेल, असा विश्वास दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

सदरचा सामंजस्य करार हा संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष महादेव गायकवाड, सचिव अंकुश गायकवाड आणि विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी रित्या पार पडला.

कामगार पाहिजेत
आमच्या फर्म मध्ये खालील जागा भरणे आहेत

| | | |
|---|---|---|
| 1 | कॉम्प्युटर ऑपरेटर | 2 |
| 2 | ड्रायव्हर कम सेल्समन | 3 |
| 3 | लोडर | 4 |
| 4 | गोडाऊन कीपर | 1 |

आकर्षक पगार दिला जाईल
माऊली एजन्सीज
मिरज रोड सांगोला
मोबा.9225804792

माऊली लॅबोरेटरी
शुगर (३ महिन्याची ॲव्हरेज शुगर), पेशी, लिव्हर, किडनी, कॅलशिअम, थायरॉईड, व्हिटॅमीन, थुंकी, युरीन व इतर टेस्ट करुन त्वरीत रिपोर्ट दिले जातील.
* २४ तास सेवा * होम व्हिजीट ॲव्हेलेबल
पत्ताः पाटील हॉस्पिटल शेजारी, टायटन शोरुमसमोर, भोपळे रोड, सांगोला
संपर्क: श्री.नवनाथ सुरेश शेळके (बी.एस्सी.केमिस्ट्री) एडीएमएलटी
मो.9689589264

# अस्तित्व संस्थेच्या वतीने महिला दिनानिमित्त मांजरी येथे महिला मेळावा संपन्न

## विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या महिलांचा केला सन्मान

सांगोला(प्रतिनिधी):- ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त मांजरी तालुका सांगोला येथे महिला मेळावा व कर्तृत्ववान महिलांचा सन्मान कार्यक्रम ८ मार्च रोजी आयोजित करण्यात आला होता या मेळाव्यात मांजरी व परिसरातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

अस्तित्व संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते शहाजी गडहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली अस्तित्व संस्थेच्या वतीने मांजरी येथे संपन्न झालेल्या मेळाव्यात कर्तुत्ववान सावित्रीच्या लेकींचा विशेषतः विधवा महिला, सयमी, गुणवान माता, आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या आरोग्यसेविका, आशावर्कर, एमएससीबी बचत गटाच्या- आयसीआरपी, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, माजी महिला सरपंच, सामाजिक कार्यकर्त्या,तरूण महिला उद्योजिका , एकल -विधवा महिलांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. अस्तित्व संस्थेच्या कार्यकर्त्या सौ अर्चना खर्चे यांनी सावित्रीमाईंची ओवी सादर करून महिला मेळाव्याची सुरुवात केली.

त्यांनी आपल्या प्रास्ताविकात अस्तित्व संस्थेच्या कामाविषयी माहिती सांगितली. त्यांनी अस्तित्व संस्था गेल्या २५ वर्षापासून आपल्या भागात सामाजिक प्रश्नांवर काम करीत असल्याचे सांगितले. तसेच महिला-मुलींची असुरक्षितता, मुलगा-मुलगी समानता, स्त्री पुरूष समानता, महिलांच्या आरोग्य ची सध्याची परिस्थिती,आजारांचे वाढते प्रमाण, निमियाचे वाढते प्रमाण व उपाय योजना, सकस आहार, स्वयंपाकासाठी आवश्यक लोखंडी कढई, आहारात पालेभाज्या, रानभाज्यांचे महत्व सांगितले.तसेच अन्न हेच औषध हा आरोग्य विषयी संदेश त्यांनी दिला. विधवा महिलांसाठी पेन्शन योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना अशा विविध शासकीय योजनाविषयी माहिती सांगितली

या कार्यक्रमामध्ये महिलांच्या मनोरंजासाठी,संगीत खुर्ची,धागा सोडणे इ.स्पर्धा घेऊन विजेत्या महिला स्पर्धकास बक्षीसही देण्यात आले तसेच रंग, फुगडी खेळून महिलांनी या कार्यक्रमाचा निसंकोच पणे आनंद घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्तित्व संस्थेच्या कार्यकर्ता अक्षता सोनवले यांनी केले,

तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मांजरी गावातील सपना बनसोडे,हेमलता कांबळे,दिक्षा उबाळे,सारिका घाडगे,निलम उबाळे,सुजाता भुसे तसेच विनोद उबाळे, यश सोनवले, आदित्य तोरणे इ समविचारी महिला व युवकांनी सहकार्य केले.शेवटी अस्तित्व संस्थेच्या कार्यकर्ता आक्षता सोनवले यांनी सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन उपस्थित महिलांचे आभार मानले.

अर्ज न. ३४७/२०२५

## जाहीर नोटीस

सांगोला येथील मे.तहसिलदार साहेब,तालुका सांगोला यांचे कोर्टात

इस्माईल गफूरसो मुलाणी — अर्जदार
वय: ७६ वर्षे, धंदाः शेती,
रा.मु.पो.महूद, ता. सांगोला,जि. सोलापूर.

विरुध्द

मा. निबंधक, जन्म-मृत्यु नोंदणी — सामनेवाला
ग्रामपंचायत महूद, ता. सांगोला, जि. सोलापूर.

ज्याअर्थी यातील अर्जदार यांची सख्खी बहिण झैयदाबी गफूरसो मुलाणी यांचा दिनांक ०१/०६/१९६२ रोजी महूद, ता. सांगोला, जि. सोलापूर येथे जन्म झालेला असून सदर तारखेची सामनेवाला यांच्याकडे नोंद होऊन जन्म दाखला मिळणे कामी अर्जदार याने मे. कोर्टाकडे अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे कामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत किंवा नेमलेली तारीख १३/०४/२०२६ रोजी स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी केली जाईल.

हे आज दिनांक ११ माहे मार्च इसवी सन २०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्दी केले असे.

| सही | हुकूमावरुन | सही |
|---|---|---|
| लिपीक | | तहसिलदार सांगोला |

स्कीन क्लिनिक
डॉ.करमुडे यु.एम. एम.बी.बी.एस.एम.डी.पुणे (त्वचारोग तज्ञ)
मो.७०८३३३४४३४, ९९७५७०७७२७
सेवानिवृत्त प्रमुख डॉक्टर, त्वचारोग विभाग, ससून हॉस्पिटल, पुणे
ठिकाण:- सांगोला, म.फुले चौक (पुतळ्याजवळ), महात्मा फुले संकुल, तळमजला, बी-१ (नवीन इमारत)



डॉ.करमुडे यु.एम.
वेळ-दररोज दुपारी १२ ते सांय.५ (शनिवारी बंद)

अजिंक्यतारा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सांगोला जि. सोलापूर
खालील प्रमाणे पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र | पद | पात्रता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | क्लार्क | बीकॉम/ एम.कॉम (अनुभवास प्राधान्य) | २ |
| २ | सेवक | १० वी पास (अनुभवास प्राधान्य) | १ |

पत्ता: अजिंक्य प्लाझा, वासूद रोड सांगोला
संपर्क: 9423327234, 8888570234

डॉ.बोराडे हॉस्पिटल
२४ तास अत्यावश्यक सेवा
मोबा: ९६३७२१८०९०
कडलास रोड, सांगोला.
हृदयविकार, रक्तदाब, मधुमेह, विषबाधा, पॅरेलेसिस फिट्स, लिव्हर, किडनीचे आजार या व अशा आजारावर निदान व उपचार
डॉ. प्रमोद धर्मराज बोराडे. MBBS D.N.B (मेडिसीन)
डॉ. सौ. प्राजक्ता प्रमोद बोराडे B.A.MS DRCH (स्त्री रोग तज्ञ)
आपल्या हक्काचं हॉस्पिटल डॉ.बोराडे हॉस्पिटल

# सांगोला पंचायत समितीच्या सभापतीपदी भाजपच्या पूनम इंगवले तर उपसभापतीपदी शिवसेनेचे अजय सरगर



**देर आये, दुरुस्त आये..!**

**सांगोला तालुक्यातील प्रत्येक कार्यकर्त्याला मी आणि दिपकआबांनी एकत्र असावे असे वाटते. गेल्या दीड वर्षापासून आम्ही एकमेकापासून वेगळे होतो. आम्ही एकमेकांच्या विरोधात विधानसभा लढवली. परंतु कुठे ना कुठे आम्ही दोघे एकत्रच असावे असे देवाला सुद्धा वाटत असेल म्हणूनच आज पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडीच्या निमित्ताने आम्ही पुन्हा एकत्र आलो आहोत.**

**माजी आमदार शहाजीबापू पाटील**

**विकासाच्या मुद्द्यावर सदैव सोबत....**

**सामान्य जनतेचा विकास झाला पाहिजे हा माझा नेहमी आग्रह असतो. आगामी काळात जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमारभाऊ गोरे यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा वाहिनी पवार यांच्या माध्यमातून सांगोला तालुक्याचा गतिशील विकास व्हावा ही माझी भूमिका आहे. विकासाच्या मुद्द्यावर आपण सदैव माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्यासोबत राहू.**

**माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील**

सांगोला (प्रतिनिधी): सांगोला तालुक्याच्या राजकारणात ऐतिहासिक उलथापालथ घडवत तब्बल पन्नास वर्षे अबाधित असलेली शेकापची सत्ता अखेर संपुष्टात आली असून पंचायत समितीवर पहिल्यांदाच भाजप-शिवसेनेचा झेंडा फडकला आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा करिष्मा पाहायला मिळाला. माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील यांच्या गटातील तीन पंचायत समिती सदस्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने तालुक्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. दरम्यान, पंचायत समितीच्या सभापतीपदी भाजपच्या पुनम इंगवले तर उपसभापतीपदी शिवसेनेचे अजय सरगर यांची बहुमताने निवड झाली. दिपकआबांनी गेम फिरवल्याने गेल्या ५० वर्षापासूनची सांगोला पंचायत समितीवरील शेकापची सत्ता संपुष्टात आली असून पहिल्यांदा भाजप आणि शिवसेनेची सत्ता आली आहे. या सत्ता समीकरणात दीपकआबा पुन्हा एकदा 'किंगमेकर'च्या भूमिकेत दिसत असून त्यांच्या या निर्णयामुळे पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकला आहे..पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती निवडीसंदर्भात पंचायत समितीच्या कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सभापती पदासाठी भाजपकडून पुनम इंगवले तर शेकापकडून काजल काशीद यांनी अर्ज दाखल केले. उपसभापती पदासाठी शिवसेनेकडून अजय सरगर तर शेकापकडून छाया कोळेकर यांनी अर्ज दाखल केले. यावेळी हात उंचावून मतदान घेण्यात आले. सभापती निवडीत भाजपच्या पुनम इंगवले यांना ८ तर शेकापच्या काजल काशीद यांना ६ मते मिळाली. उपसभापती पदाच्या निवडीत शिवसेनेचे अजय सरगर यांना ८ तर शेकापच्या छाया कोळेकर यांना ६ मते मिळाली.

यांनतर सभापतीपदी भाजपच्या पुनम इंगवले व उपसभापतीपदी अजय सरगर यांची निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी बी. आर.माळी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांनी जाहीर केले. दरम्यान, सभापती व उपसभापती निवडीप्रसंगी नगराध्यक्ष आनंदा माने, जिल्हा परिषद सदस्य दादासाहेब लवटे, शोभाताई खटकाळे, युवानेते सागर पाटील , सूरज पाटील, युवानेते यशराजे साळुंखे पाटील, गुंडांदादा खटकाळे, युवानेते योगेशदादा खटकाळे, उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, नगरसेवक सोमेश यावलकर, बाळासाहेब काटकर, ॲड.सचिन देशमुख, संभाजी आलदर, यांच्यासह भाजप, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हा परिषद पंचायत समितीची निवडणुक भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत आणि शिवसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी एकत्रित लढली होती. तर आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी माजी आमदार दीपकआबा साळुंखे यांच्यासोबत आघाडी करुन निवडणूक लढवली होती. यामध्ये शेकाप आघाडीने १४ पैकी नऊ जागा जिंकत बहुमत मिळविले होते. यामध्ये शेकापला ६ आणि दीपकआबा गटाला तीन जागा मिळाल्या होत्या.भाजपला एक आणि शिवसेनेनेने चार जागा जिंकल्या होत्या

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ऑपरेशन लोटस यशस्वी करून दीपकआबा गटातील तीन सदस्यांचा भाजपमध्ये प्रवेश घडवून आणला. विधानसभा निवडणुकीनंतर दीपकआबा साळुंखे पाटील हे तटस्थ भूमिकेत असून त्यांनी अद्याप कोणत्याही पक्षात अधिकृत प्रवेश केलेला नाही. मात्र दोन दिवसांपूर्वी घेतलेल्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत कार्यकर्त्यांना योग्य वाटेल तोच निर्णय घेतला जाईल असे सांगत त्यांनी राजकीय उत्सुकता अधिक वाढवली. त्यातच त्यांनी राजकारणात कोणी कायमचा शत्रू नसतो आणि कोणी कायमचा मित्र नसतो, सत्तेसाठी तडजोडी कराव्याच लागतात, याची प्रचिती देऊन पंचायत समितीच्या तीन सदस्यांचा भाजपमध्ये प्रवेश करून शेकापच्या ५० वर्षाच्या सत्तेला सुरुंग लावला.दरम्यान सभापती व उपसभापती निवडीनंतर महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत फटाक्यांची आतिषबाजी केली.

# अबब! सांगोला विद्यामंदिरचे तब्बल १७३ विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत पात्र

सांगोला (वार्ताहर) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या एन.एम.एम.एस. या परीक्षेत सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील विद्यार्थ्यांनी दैदीप्यमान यश प्राप्त करत यशाची परंपरा राखली.

या परीक्षेत प्रविष्ट एकूण विद्यार्थी २०२ पैकी १७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १५० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ०३ विद्यार्थी, १४० पेक्षा अधिक गुण मिळवणारे १८ विद्यार्थी, १३० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ३५ विद्यार्थी, १२० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ६३ विद्यार्थी, ११० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ९९ विद्यार्थी, तर १०० पेक्षा अधिक गुण मिळवणारे १२८ विद्यार्थी आहेत.

कुमारी सुबोधिनी गुंडोपंत इंगवले हिने १५६ गुण मिळवून प्रशालेमध्ये प्रथम क्रमांक येण्याचा मान मिळवला.

सदर विद्यार्थ्यांना एनएमएमएस विभागातील सर्व शिक्षकांसह विभाग प्रमुख निलेश जंगम, संस्था बाह्यपरीक्षा विभागप्रमुख नामदेव खंडागळे, प्रशाला बाह्यपरीक्षा विभागप्रमुख सिताराम राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.

या उज्वल यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांसह पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्था अध्यक्ष आदरणीय प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, संस्था उपाध्यक्ष ॲड.विजयसिंह चव्हाण, संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, संस्था सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, कार्यकारणी सदस्य विश्वेशजी झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, विभागनियंत्रक व पर्यवेक्षक प्रदिप धुकटे, उत्तम सरगर, काकासाहेब नरुटे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सदर परीक्षेची शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांची यादी लवकरच प्रसिद्ध होणार असून सांगोला विद्यामंदिर प्रशालेच्या परंपरेप्रमाणे प्रतिवर्षी विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेमधून जवळपास ५० लाखांच्या आसपास शासकीय शिष्यवृत्ती संपादन करत असतात.

# आलेगाव शाळेत स्नेहसंमेलनाचा जल्लोष




आलेगाव(वार्ताहर):- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आलेगाव येथे दिनांक १० मार्च २०२६ रोजी संध्याकाळी सहा वाजता वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोषात संपन्न झाले.

उद्घाटन केंद्राचे केंद्रप्रमुख मठपती साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गाणी, भारुड, राज्याभिषेक सोहळा, माझी मराठी शाळा गीत, गोंधळ गीत, कृष्ण गीत टिपरी गीत, कॉमेडी डान्स, देशभक्तीपर गीत, वाघ्या मुरळी गीत शेतकरी गीत, लावणी अशा विविध कला सादर केल्या. राज्याभिषेक सोहळा हा कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरला.

या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका श्रीमती चव्हाण मॅडम, श्रीमती झाडबुके मॅडम, श्रीमती जिरगे मॅडम व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. धनाजी यादव तसेच सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमासाठी श्री.प्रशांत मिसाळ सर, श्री. तानाजी कांबळे सर व श्रीमती शिंदे मॅडम यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. आकाश नवघरे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडले.संपूर्ण कार्यक्रम खूप उत्कृष्ट सादर करण्यात आला. आलेगाव चा प्रेक्षक वर्ग उदंड प्रमाणात हजर होता. सर्व प्रेक्षकांनी कार्यक्रमाचे खूपच कौतुक केले.

# उत्कर्ष प्राथमिक विद्यालयात इयत्ता दुसरीचा उपक्रम आठवडा बाजार उत्साहात संपन्न.



सांगोला:-पाठ्यपुस्तकातील पाठाला अनुसरून मुलांना व्यवहार कसे करावे, खरेदी विक्री, पैशांची देवाण-घेवाण कशी करावी हे प्रात्यक्षिकातून ज्ञान मिळावे म्हणून हा आठवडा बाजार उत्कर्षच्या प्रांगणात भरवण्यात आला या आठवडा बाजाराचे उद्घाटन इयत्ता दुसरीचे बाल चिमुकले व नूतन नगरसेविका सौ सुजाताताई चेतनसिंह केदार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी माध्यमिकविभागाचे प्राचार्य श्री कुलकर्णी सर, मागाडे ताई,स्वरालीताई माध्यमिकचे पर्यवेक्षक भोसले सर हे उपस्थित होते.

या आठवडा बाजारात विविध प्रकारच्या भाज्या, मिरची, कांदा लसूण,टोमॅटो, पालेभाज्या, शेंगदाणे,फुटाणे विविध प्रकारची फळे, ज्यूस, शेवया, पापड्या इत्यादी साहित्य विकण्यासाठी होते. या आठवडा बाजारातून मुलांनी खूप आनंद घेतला. इयत्ता पहिली, तिसरी चौथीच्या विद्यार्थ्यांनी छान भाजी खरेदी केली. इयत्ता दुसरीचे शिक्षक नकातेताई महिमकरताई, दिवटेताई, जांगळे ताई यांनी परिश्रम घेतले.

**डॉ.भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले.**

**वाया कापूस विक्री टेंडर**

सर्व तमाम वाया कापूस व्यापा-यांना कळविण्यात येते की, आमच्या संस्थेचे माहे फेब्रुवारी २०२६ व मार्च २०२६ पर्यंतचे निघणारा वाया कापूस विक्रीचे टेंडर मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुकांनी आपले टेंडर सोबत बयाण रक्कम रूपये ३०,०००/- आरटीजीएसने दि. २०/०३/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठवावेत. टेंडर बाबतच्या अटी व इतर शर्ती कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.

सही कार्यकारी संचालक | व्हाईस चेअरमन | सही चेअरमन

## डॉ.झाकीर हुसेन नागरी पतसंस्थेकडून रमजान ईदनिमित्त साखर व ड्रायफ्रूट वाटप

सांगोला(प्रतिनिधी):- डॉ. झाकीर हुसेन नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सांगोला (जि. सोलापूर) यांच्या वतीने रमजान ईद निमित्त सभासदांसाठी साखर व ड्रायफ्रूट वाटप कार्यक्रम शुक्रवार दिनांक १३ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

१३ मार्च ते २० मार्च २०२६ या कालावधीत पतसंस्थेच्या कार्यालयात शाही जामा मशिदजवळ, खरेदी-विक्री संघासमोर, सांगोला येथे हा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेत उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

TATA POWER
SOLAROOF
भारताची क्र. १ ची सोलर रूफटॉप कंपनी*
TATA
अधिकृत चॅनल पार्टनर: सनर्जी सोलर
संपर्क : 9022908009 / 9075929191 8009300996. मार्केट यार्ड समोर, पंढरपूर रोड, सांगोला
हे ऑन तर क्वालिटी लाइफलाँग

मुली व महिलांनसाठी, शिवण क्लास कोर्स
पहिली बॅच सुरु होत आहे.
आपलं नांव आजचं नोंद करा.
सौ. कविता कांबळे,
रत्नपारखी ज्वेलर्सच्या पाठीमागे, सांगोला,
मोबा-8087545513

खास गुढीपाडवा निमित्त...
मुक्ताई ट्रॅक्टर (खारवटवाडी) सांगोला यांचे तर्फे
शेतकरी बांधवांसाठी खास ऑफर




आयशर ट्रॅक्टर 557 वर 50,000/- रुपये सूट
आयशर ट्रॅक्टर 551 (प्रायमा) वर 40,000/- रुपये सूट
+ घरातील मुलीच्या शिक्षणासाठी 20,000/- रुपये



आयशर ट्रॅक्टर 280+ वर 30,000/- रुपये सूट
18 एच.पी ते 60 एच.पी. पर्यंत अनेक मॉडेलचे ट्रॅक्टर उपलब्ध
मुक्ताई ट्रॅक्टर शोरूम,
सांगोला-जत रोड, खारवटवाडी, सांगोला
प्रो.प्रा.श्री.बाबासाहेब दिघे मोबा.9423829965
श्री.गणेश सुरवसे 9579846326 श्री.सुनील खांडेकर 8263083435